वाचले -

१) महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम २००६

२) एकत्रिकृत विकास नियत्रण व प्रोत्साहन नियमावली दि. २/१२/२०२०

३) मा. अवर सचिव, नगर विकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील दि.२/०८/२०२१ चे पत्र

४) मा. आयुक्त यांचे कडील दि. २६/१०/२०२१ चा आदेश.

५) मा. विधी समिती ठराव क्र. ९ दि. २०/१२/२०२१ चा ठराव

६) मा. महापालिका सभा ठराव क्र. ७६५ दि. २०/१/२०२२ चा ठराव

८) मा. सभापती, महाराष्ट्र विधान परिषद, मुंबई दि. २२/२/२०२२ रोजीची बैठक.

७) पुणे महानगरपालिकेचा दि. १४/७/२०२२ चे सुधारीत दर आदेश

८) मा. आयुक्त तथा प्रशासक यांचेकडील दि. १४ /७/२०२२ चा मान्य प्रस्ताव.

*******************************************************************************************

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी -१८, अग्निशामक विभाग
क्र. अग्नि/४/ कावि/ ३३० /२०२२
दि. १४ /०७/२०२२

विषय : अग्निशमन सेवा शुल्क "अ" दर आकारणी बाबत.

आदेश,

मा. अवर सचिव, नगर विकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील क्र. टिपीएस -१८२१/प्र.क्र.१०३ /२०२१/नवि-१३,दि.२/०८/२०२१ अन्वये, " मंजूर एकत्रिकृत विकास नियत्रण व प्रोत्साहन नियमावलीतील विनियम २.२.१४ (ii) मधील तरतुदीनुसार फायर इन्फ्रास्ट्रक्चर चार्जेसची आकारणी वेगळयाने करण्याची आवश्यकता नाही, मात्र महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसुरक्षा अधिनियम, २००६ मधील तरतुदींनुसार आवश्यक ती फी / शुक्ल आकारणी करण्यात यावी व त्याचा विनियोग सदर अधिनियमातील तरतुदींनुसार करणेत यावा" असे आदेश शासनाकडुन प्राप्त झाले आहेत.

सदर तरतुदीनूसार वाचले क्र. ४ ते ६ अन्वये, अग्निशामक ना हरकत दाखला देणेकामी अग्निशमन सेवा शुल्काचे यापुर्वीचे प्रचलित दरांमध्ये पुणे मनपा प्रमाणे सुधारणा करुन पिंपरी चिंचवड महानगरपालिकाकडुन यापुर्वी इमारत बांधकामांना "अग्निशमन सेवा शुल्क " ऐवजी " फायर प्रिमियम चार्जेस " च्या सुधारित दरांचा तक्ता मंजूर करून आकारणी करणेत येत आहे.

तथापि, सदर बाबत मराठी बांधकाम व्यावसायिक असोसिएशन, नारेडको, क्रेडाई या संस्थांनी सदर शुल्क कमी करण्याची मागणी केली होती. विविध संस्था, संघटना तसेच बांधकाम व्यावसायिक यांनी वेळोवेळी सदरचे दर परवडत नसून त्यामुळे बांधकाम व्यावसायिक अडचणीत आलेबाबत तक्रारी / निवेदने केली होती. त्यामुळे महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवरक्षक उपाययोजना अधिनियम, २००६ मधील तरतूदीनुसार कार्यवाही करून कलम ११ (१), (२), (३) तसेच इतर बाबीं अन्वये अग्निशमन सेवा शुल्क चे दर कमी करणे आवश्यक आहे.

सबब, मी. आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका,पिंपरी – १८ मला प्राप्त अधिकारानूसार अग्निशमन सेवा शुल्कासह महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम २००६ चे कलम ११ मध्ये नमूद अग्निशामक ना हरकत दाखला देणेकामी अग्निशमन सेवा शुल्काचे यापुर्वीचे प्रचलित दरांमध्ये सुधारणा करुन पिंपरी चिंचवड महानगरपालिकेकडुन इमारत बांधकामांना " अग्निशमन नाहरकत दाखला शुल्क - अ " मधील सुधारित दरांचा तक्ता " परिशिष्ट – अ " नूसार नव्याने आकारणी करावयाचे दर हे आदेशाचे दिनांका पासुन शासन मान्यतेच्या अधीन राहून लागू करणेत येत आहेत. तथापी, अग्निशमन सेवा शुल्काचे निश्चित केलेल्या दरांमध्ये भविष्यात पुढे शासन मान्यता प्राप्त होताना बदल झाल्यास, जादा झालेली रक्कम संबंधित विकसकास त्याच अथवा अन्य बांधकाम अग्निशामक ना हरकत दाखला प्रकरणी भरावयाच्या रकमेमध्ये समायोजित करणेत येईल. तसेच शुल्कात वाढ झालेस, सदरचे शुल्क संबंधिताकडुन नियमानूसार व्याजासह वसुली अनुज्ञेय राहील. या बाबत लेखी हमीपत्र संबंधिताकडून घेणेत यावेत.

14/07/22

आयुक्त तथा प्रशासक
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी -१८

प्रत –

अग्निशामक विभाग

............ आदेशाचे दिनांकापासून परिशिष्ट "अ" प्रमाणे अग्निशमन सेवा शुल्क "अ" नूसार सेवा शुल्क आकरणेत यावेत.

# अग्निशमन सेवा शुल्क " अ "

## परिशिष्ट – "अ"

(१५ मी. उंचीवरील व ५०० चौ. मी किमान क्षेत्रफळ )

| १ | २ | ३ |
|---|---|---|
| अ.क्र. | अग्निशमन सेवा शुल्क "अ " ची आकारणी करायचा इमारत उंचीचा टप्पा | अग्निशमन सेवा शुल्क "अ" चे दर |
| १ | १५ मी. उंचीपर्यंतच्या विशेष वापराच्या विविध प्रकारच्या भोगवटा असणाऱ्या इमारती.<br>अ ) ५०० चौ.मी. पेक्षा जास्त क्षेत्रफळ असणाऱ्या इमारती. | १०० रु. प्रती. चौ. मी<br>(र.रु. ३५,०००/- किमान) |
| २ | १५ मी. ते ४० मी. उंचीच्या इमारती | १३० रु. प्रती. चौ.मी<br>(र.रु १,४०,०००/- किमान) |
| ३ | ४० मी. ते ७० मी. उंचीच्या इमारती | ३३०/- रु प्रती. चौ. मी.<br>(र.रु ३,५०,०००/- किमान) |
| ४ | ७० मी. ते १०० मी. उंचीच्या इमारती | ५५०/- रु. प्रती. चौ. मी.<br>(र.रु. ५,६०,०००/- किमान) |
| ५ | १०० मी. ते १५० मी. उंचीच्या इमारती | ८००/- रु. प्रती. चौ. मी.<br>(र.रु. १०,५०,०००. किमान) |
| ६ | १५० मी. पेक्षा जास्त उंचीच्या इमारती | १,०००/- रु.प्रती. चौ. मी.<br>(र.रु १४,००,००० किमान) |

* वरीलप्रमाणे रकाना ३ मध्ये नमूद करण्यात आलेले सुधारित दर हे रकाना २ मध्ये नमूद उंचीच्या टप्प्यातील इमारतीच्या संपूर्ण बांधीव (Gross Builtup )क्षेत्रासाठी लागू होतील.

14/07/22

आयुक्त तथा प्रशासक
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी -१८